प्राप्त दिनांक : ११/११/२०२०
नोंदणी दिनांक: ११/११/२०२०
निकाल दिनांक: १४/०८/२०२६
कालावधी : ०५व. ०९म. ०३दि
**निशाणी क्र.** :५४

**पिंपरी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ( ७ वे सह न्यायालय) यांच्या न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी के.के.वाघमारे यांचे समोर)**
**फौजदारी चौकशी अर्ज क्रमांक ७९६/२०२०**
**सी.एन.आर.क्रं.एम.एच.पी.यु ०९—०१६१६९—२०२०**

शितल जितेंद्र बारवे
वय २९ वर्षे, धंदा : नोकरी,
रा. स्वामी समर्थ कॉलनी,
मालेकर गार्डन जवळ, लेन नं. ०८,
शरदनगर, चिखली, पुणे ४११०३०....**अर्जदार.**

**—विरूध्द—**

१. जितेंद्र पदमाकर बारवे
वय ३२ वर्षे, धंदा : व्यापार,
रा. शेजवल पार्क, आर्शिवाद सोसायटी,
लेन नं. ७, चंदननगर, खराडी, पुणे ४११०१३

२. पदमाकर गणपत बारवे
वय ५५ वर्षे, धंदा : शेती

३. कल्पना गणपत बारवे
वय ५२ वर्षे, धंदा : शेती
जाबदेणार नं. २ व ३ राहणार
रा. फलॅट नं. अ—३०६, एसआर नं. ७९/१,
आर्यन अपार्टमेंट, दांगट इंडस्ट्रीयल इंस्टेट,
शिवने, अगरवाल गोडाउन जवळ,
पुणे. ४११०२३./
रा. ठक्करवाडी, पांडुरंग मंदीराजवळ,
आंबेगाव, चास, पुणे. ४१०५१५. ..**गैरअर्जदार.**

**"कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२, १७, १८, १९, २०, २२ आणि २३ अन्वये अर्ज''——**

अर्जदारातफे श्री. भरत चरण तज्ञ वकील,
गैरअर्जदारेंतर्फे श्रीमती राजश्री चासकर तज्ञ वकील.

---

## <u>न्यायनिर्णय</u>

**(घोषित दिनांक १४ ऑगस्ट २०२६)**

१. अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज महिलांचा घरगुती अत्याचारांपासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००५, चे कलम १२, १७, १८, १९, २०, २२ आणि २३ अन्वये दरमहा रक्कम, नुकसान भरपाई रक्कम आणि संरक्षण आदेश मिळावा इत्यादी मिळणे करीता दाखल केला आहे.

**<u>अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की</u> —**

२. अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह १७.०५.२०१९ रोजी जि. पुणे येथे हिंदु रितीरिवाजानुसार संपन्न झाले असून उभयतांचे वैवाहिक संबंध अद्‌याप कायम आहेत. अर्जदार हि लग्न झाल्यानंतर सासरी नांदायला गेल्यानंतर १० ते १५ दिवस चांगले नांदविले. उभयतांच्या वैवाहिक संबंधातून कोणतेही अपत्य नाही. गैरअर्जदार क्र.१ हे पती, गैरअर्जदार क्र.२ व ३ हे सासु—सासरे आहे. अर्जदाराच्या आई वडीलांनी अर्जदार व जाबदेणार यांना संसारउपयोगी वस्तू व सोनेनाणे देवून लग्न केले आहे.जाबदेणार यांनी अर्जदार हिस जाबदेणार क्र. १ हा केमिकल कंपनीमध्ये कायमस्वरुपी नोकरीस आहे असे खोटे सांगितले आहे. त्यानंतर जाबदेणार नं. १ यांनी एक महिन्यानंतर नोकरी सोडली. अर्जदार हि नोकरी करीत असल्याने सर्व पगार जाबदेणार यांना दयायचे असे जाबेदणार क्र. १ व २ यांनी शिवणे येथे घेतलेली सदनिका ८ लाख रुपयांना गहाण ठेवली व सदनिकेचे हप्ते जाबदेणार यांनी अर्जदार हिला जून २०१९ ते आक्टोबर २०२० पर्यंत महिन्याला रक्कम रुपये १५ हजार ही जाबदेणार यांच्या आयडीबीआय बॅकेच्या खात्यावर पैसे ट्रान्सफर करण्यास सांगितले तसेच अर्जदार हिने घराचे भाडे भरले व घर चालविले अशी एकूण रक्कम २,५५,०००/— अर्जदार हिने जाबदेणार यांना

दिलेले आहे. त्यानंतर जाबदेणार क्र. १ यांनी एसजीबी इन्व्हॉमेंटल इंजिनिअरींग प्रा. लि. कंपनी सुरु केली व त्यात अर्जदार हिला डायरेक्टर बनविले व फार्मवर बळजबरीने सहया घेतल्या व कंपनीच्या नावे बॅकेमध्ये अकांउट आपन केले असून त्यासाठी पन्नास हजार अर्जदाराकडून घेतले.

**३.** जाबदेणार हे घरी बसून होते व मोबाईलवर अश्लील चित्रे बघत असत. त्यानंतर अर्जदार ही रात्री ८.०० ते ८.३० च्या वाजेपर्यत घरी आल्यानंतर अर्जदार ही सर्व घरातील कामे करत असे त्यानंतर झोपण्यासाठी गेले असता जाबदेणार क्र. १ हा अर्जदारासोबत बळजबरीने लैंगिक संबंध करण्यास सांगत असे अर्जदाराने नकार दिला असता जाबदेणार क्र. १ ने अर्जदार हिस मारहाण केली. सप्टेंबर २०२० मध्ये जाबदेणार क्र. १ ने अर्जदारास पुरणपोळी बनविण्यास सांगितले असता अर्जदार हीने माझे ऑनलाईन काम चालू आहे त्यामुळे मी पुरणपोळी करु शकत नाही तेव्हा जाबदेणार क्र. १ याने चहामधील बिस्कीट काढून अर्जदाराच्या तोंडावर लावले त्यामुळे अर्जदार हिच्या तोंडला गरम वाफ लागली. तसेच जाबदेणार क्र. १ हे अर्जदारास मोबाईलवर अश्लील चित्रे बघायला सांगत असे. तसेच इतर जाबदेणार देखील अर्जदार हिस अश्लील शिवीगाळ करीत असे. तसेच जाबदेणार हे अर्जदारास म्हणत असे की तु ऑफीसमध्ेय मुलांबरोबर काम करायचे नाहीत तसेच जाबदेणार क्र. १ हा अर्जदार हिचा मोबाईल चेक करत असे. तसेच अर्जदारास जाबदेणार हे वारंवार पाणउतारा करीत असे व वाईट टोमणे मारत असे. जाबदेणार हे अर्जदार हिच्या आईवडीलांना भेटू देत नसे.

**४.** गैरअर्जदार यांच्या शारिरीक व मानसीक त्रासामुळे अर्जदार ही खचुन गेलेली आहे. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिस नांदवण्यास नकार देवून वैवाहीक सुखापासुन वंचीत ठेवले आहे. गैरअर्जदाराने

अर्जदारांची उदरनिर्वाहाची व्यवस्था केलेली नाही. उलटपक्षी गैरअर्जदार यांची आर्थिक स्थिती चांगली आहे. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार यांचा अन्न, वस्त्र, निवारा, व औषधोपचार याची कसलीही तरतुद केलेली नाही.

**५.** सबब, अर्जदार हिला गैरअर्जदार क्र. १ यांच्याकडून दरमहा रक्कम रू. २०,०००/— प्रमाणे दरमहा अन्नवस्त्रासाठी व घरभाडेपोटी रक्कम मिळण्याची विनंती केलेली आहे. तसेच औषधोपचारासाठी प्रतिमाह १००००/— रूपये ची व वाहतुकीचा खर्च म्हणुन रक्कम रुपये ५,०००/— ची मागणी केली आहे. तसेच इएमआय चे भरलेले हप्ते रक्कम रुपये ६,०००/— असे १२ महिन्याची भरलेली रक्कम तसेच अर्जदारने तिला झालेल्या त्रासाबददल नुकसान भरपाई म्हणून रु. ३०,००,०००/— व अर्जदार हिचे स्त्रीधन तीन तोळे सोने भांडीकुडी व इतर गृहउपयोगी साहित्य गैरअर्जदाराकडून मिळण्याची मागणी केली. गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे अर्जदार हिस सतत मारहाण व शिवीगाळ व धमकी देत असल्यामुळे त्यांच्यापासून तिला संरक्षण आदेश मिळावी अशी विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

**६.** गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे प्रस्तुत प्रकरणामध्ये हजर झाले. जाबदेणार क्र. १ ने नि. क्र. १६ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी त्यांचे म्हणणे मध्ये अर्जदाराचा व जाबदेणार क्र. १ यांचा विवाह झाला हे कथन सोडून बाकी सर्व कथने नाकारली आहेत. अर्जदार ही जाबदेणारांकडे २ ते ३ महिने व्यवस्थीत नांदली. त्यानंतर अर्जदार ही जाबदेणार यांना आई वडीलांनी तुझया साठी काय केले, तुझी लायकी नाही स्वताचे घर घेण्याची असे म्हणुन हिनवीत असे. तसेच जाबदेणार क्र. १ याला नोकरीच्या माध्यमातून जास्त पगार नसल्याने अर्जदार हिनेच जाबदेणार क्र. १ यांना आपण व्यवसाय करु असे सुचविल्याने जाबदेणार क्र. १ ने नोकरी सोडली. जाबदेणार व अर्जदार यांनी एसजेबी पर्यावरण

अभियांत्रीकी प्रा. लि. कंपनी फार्म केली व संचालक अर्जदार असल्याने त्यांची सही सर्व व्यवहारामध्ये महत्वाची होती जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदार हिला फसवुन सहया घेतल्या नाहीत. तसेच जाबदेणार यांना कोणतेही व्यसन नसून अर्जदार हि स्वत: चांगल्या पगाराच्या नोकरीवर आहे. तसेच जाबदेणार यांनी अर्जदारास कधीही पैश्याची मागणी केली नाही. अर्जदार हिने जाबदेणार क्र. १ याला कोणतेही शारीरीक, मानसिक सुख दिलेले नाही. जाबदेणार क्र. १ ने अर्जदार हिस वैवाहिक सुख देत नाही म्हणुन कधीही मारहाण केलेली नाही. अर्जदार ही जाबदेणार क्र. १ ला तू मानसिक रुग्ण म्हणुन हिनवत असे. जाबदेणार क्र. १ ने अर्जदार हिला कोणत्याही प्रकारचा शारीरीक व मानसिक त्रास दिलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिचा अर्ज खर्चासहित फेटाळण्यात यावा अशी जाबदेणार क्र. १ यांनी विंनती केली

७. जाबदेणार यांनी त्यांचा कोणताही पुरावा दाखल केले नाही. त्यामुळे जाबदेणार यांचा दि. ०६.०५.२०२५ रोजी पुरावा बंद करण्यात आला.

**<u>अर्जदाराचा पुरावा–</u>**

८. अर्जदार हिने अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ स्वत:च्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र.४०) दाखल केले आहे. तसेच तिचे जाबदेणार क्र. १ सोबत दि. १७.०५.२०२९ रोजी घोडेगाव पुणे येथे झालेले लग्नपत्रीकेची मुळ प्रत (निशाणी क्र.४१) दाखल केली आहे. वस्तु खरेदीखत मुळ बिल त्यास अनुक्रमे (निशाणी क्र.४२ ते ४७) दिले. तसेच अर्जदारच्या लग्नात त्यांच्या आईने दिलेले अंगठी, झुमके, स्टॉप्स, चैन व मोती नथ या वस्तुची खरेदी केल्याचे बिल त्यास अनुक्रमे (निशाणी क्र. ४८ व ४९) दिले. अर्जदार हिच्या धनश्री हॉस्पीटलचे सोनोग्राफी रिपोर्ट (निशाणी क्र.५०) तसेच तपासणी रिपोर्ट त्यास (निशाणी क्र.५१) तसेच

अर्जदाराने लग्नानंतर पासून ते ऑक्टोबर २०२० पर्यंत गैरअर्जदार क्र. १ ला रक्कम रुपये २० लाख दिले ते दर्शविणारा त्यांचे एसबीआय व आडीबीआय बॅकेचा खातेउतारा त्यास आर्टिकल अ व ब दिला तसेच गैरअर्जदार क्र. १ यांच्या आईचा शिवणे येथे एक फलॅट आहे हे दर्शविण्यासाठी सदरचे फलॅटचे विदयुत पुरवठयाचे बिल त्यास आर्टिकल— क इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार यांनी नि.५३ वर पुरसीस दाखल करुन पुरावा बंद केला.

**गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी कोणताही पुरावा दाखल केला नाही.**

९. अर्जदारातर्फे अॅड. ए.एस.शेख यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणामध्ये खालीलप्रमाणे बाब माझे विचारार्थ निघतात. त्यावर कारणमिमांसासह निष्कर्ष नोंदविले, ते खालीलप्रमाणे —

| **अ.क्र.** | **विचारार्थ बाब** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार हिने गैरअर्जदार तिचा कौटुंबिक जुलूम केला ही बाब सिध्द करते काय ? | होकारार्थी |
| २ | अर्जदारही कलम १८ प्रमाणे संरक्षणात्मक आदेश मिळणेस पात्र आहे असे सिध्द करते काय ? | होकारार्थी |
| ३ | अर्जदार तिचे पालन पोषणासाठी गैरअर्जदारांकडून सदर कायदयाच्या कलम २० (१) ड प्रमाणे दरमहा अन्नवस्त्राची रक्कम मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | अंशत: होकारार्थी अर्जदार हिला अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रु.५,०००/—प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ४ | अर्जदार ही गैरअर्जदारांकडून स्त्रीधन व इतर सामान मिळण्यास पात्र आहे काय? | नकारार्थी |
| ५ | अर्जदार गैरअर्जदाराकडुन तिला झालेल्या मानसिक व शारिरिक त्रासापोटी सदर कायदयाच्या कलम २२ प्रमाणे नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहे काय ? | नकारार्थी |
| ६ | अर्जदार गैरअर्जदार यांच्या कडून सदर कायदयाच्या कलम १९ प्रमाणे दरमहा घरभाडे मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होकारार्थी दरमहा रक्कम रुपये ५,०००/— |
| ७ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**—कारणमिमांसा—**

**मुद्दा क्रमांक १ करिता —**

**१०.** अर्जदाराने तिच्या अर्जाच्या पुष्टर्थ तिच्या स्वत:च्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र. ४०) वर दाखल केलेले आहे. तिच्या अर्जातील कथनांनुसार तिच्या सरतपासात प्रतिज्ञापत्राप्रमाणे कथने उधृत केली आहेत. अर्जदारने गैरअर्जदार क्र. १ हा घरकर्जाचे हप्ते फेडण्याकरीता, घराकरीता सुरक्षा रक्कम व इतर खर्चाकरीता अर्जदाराकडे बेकायदेशीरपणे व तिच्या इच्छेविरुध्द पैश्याची मागणी करुन तीचा आर्थिक छळ केला. तसेच अर्जदार हिला राहत्या घरातून बाहेर काढले त्यामुळे अर्जदार हिस मानसिक त्रास झाला. गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदाराच्या वेगवेगळया खात्याद्वारे अर्जदाराच्या परवानगी शिवाय आर्थिक व्यवहार करुन अर्जदाराची फसवणुक केलेली आहे. गैरअर्जदारांनी वेळोवेळी अर्जदार हिचा मानसिक व शारिरीक छळ केला आहे. तसेच अर्जदार हिच्या विरुध्द दर्जाहिन भाषेचा वापर करुन तीला मानसिक त्रास दिलेला आहे. गैरअर्जदारांनी अर्जदार हिचा शारिरीक छळ केला आहे. तसेच अर्जदारास

तीचे भविष्य खराब करण्याची भिती दाखवून तीला गैरअर्जदाराने मानसिक त्रास दिला. गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदाराविरोधात वैवाहिक संबंध प्रस्तापित करण्यासाठी शारिरीक बळाचा वापर करुन तीला लाथाबुक्यांनी मारहाण केली.

११. गैरअर्जदार हिस ठाकरवाडी, आंबेगाव, पुणे येथे कृषी व अकृषक मिळकती विकण्याच्या तयारीत असून त्यामध्ये अर्जदाराचा अधिकार आहे. गैरअर्जदाराने सदरच्या मिळकती विक्री केल्यास अर्जदाराचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामूळे सदरच्या मिळकती संरक्षीत ठेवणे आवश्यक आहे. गैरअर्जदाराने पुरेसे साधनसामग्री असतांनाही अर्जदार हिचा व्यवस्थित सांभाळ केला नाही. तसेच तिचा वेळोवेळी शारिरिक व मानसिक छळ केला, असे कथन केले आहे.

१२. अर्जदाराने तिच्या प्रतिज्ञापत्रात पुढे कथन केले आहे की, गैरअर्जदाराने तीच्याकडे असणा—या सर्व आर्थिक बाबी काढून घेवून तीची आर्थिक फसवणुक केली आहे. तसेच आर्थिक बाबींची पुर्तता करण्यास विरोध दर्शविल्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदार हिचा शारिरीक मानसिक व आर्थिक छळ केला. अर्जदार हिने नि.क्र. ४१ वर लग्नपत्रिका, नि.क्र. ४३ ते ४७ वर वस्तु खरेदीच्या पावत्या तसेच नि. क्र. ४८ व ४९ वर दागिने खरेदीच्या पावत्या, नि. ५० व ५१ वर वैदयकीय कागदपत्र दाखल केले आहेत. अर्जदाराने तिच्या स्वत:च्या कथनाव्यतीरिक्त गैरअर्जदारांनी तिच्यावर मानसिक व शारीरीक छळ केल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. गैरअर्जदाराने अर्जदाराचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदाराचे कथने विनाआव्हानित राहीली. अर्जदाराने दिलेल्या प्रतिज्ञापत्रातील कथन व अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेली कागदपत्र या सर्व परिस्थीतीजन्य पुराव्यावरुन असे गृहीत धरता येईल की, अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार झालेला आहे. कौटूंबिक

हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदयान्वये अर्जदारावर झालेल्या अत्याचाराच्या घटनाक्रमाला दुजोरा देण्यासाठी तिने शपथपत्रावर झालेल्या अत्याचाराबाबत सांगितले असले तरी तेवढाच पुरावा हा त्या कायदयात अपेक्षित आहे. अर्जदार ही गैरअर्जदार क्रं. १ सोबत लग्नानंतर नांदावयास गेलेली आहे. उभयतांमधील पति पत्नीचे संबंध अद्याप कायम आहेत.

**१३.** कोणतीही स्त्री स्वत:चा संसार मोडावा या उद्देशाने कधीही शपथपत्रावर कोणतीही घटना जी झालेली नाहीच ती कथन करणार नाही. गैरअर्जदार हे प्रस्तुत प्रकरणामध्ये हजर होवून ही त्यांनी त्यांचा पुरावा दाखल केला नाही. तसेच गैरअर्जदारांनी अर्जदाराचा उलटतपास देखील घेतलेला नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये गैरअर्जदार हे वारंवार गैरहजर असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. गैरअर्जदार क्रं.१ यांची सदर वर्तवणुक पाहता त्यांना अर्जदाराने ते अर्जदार हिस नांदवण्यास तयार होते या निष्कर्षा पर्यंत पोहचता येत नाही. अर्जदार हिचा पुरावा विनाअव्हानीत राहिला आहे. गैरअर्जदारेंनी अर्जदारावर केलेला कौटूंबिक हिंसाचार हा चार भिंतीतील असल्यामुळे त्या सदर हिसांचाराचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार किंवा लेखी/तोंडी पुरावा असण्याची शक्यता फार थोडी आहे. त्यामुळेच परिस्थीतीजन्य पुराव्यावरुन गैरअर्जदारांनी अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे गृहीत धरता येईल व अर्जदाराने कथीत केलेल्या कौटूंबिक हिंसाचाराच्या घटनाक्रमाला विरोध करण्याकरीता गैरअर्जदारांनी अर्जदार हिचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिचे कथन विश्वासपात्र वाटते. म्हणुन हे सिध्द होते की, अर्जदार हीस कौटूंबिक हिंसाचारास सामोरे जावे लागले आहे. म्हणुन मी **मुद्दा क्रं. १ चे उत्तर होकारार्थी** दिलेले आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>** :—

**१४.** मुद्दा क्रं. १ चे उत्तर होकारार्थी दिले असल्याने व

अर्जदाराने सिध्द केले आहे तसेच या न्यायालयाचे असे मत झाले आहे की, अर्जदार हिचेवर घरगुती हिंसा झालेली आहे. तसेच गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला मारहाण केल्याचे अर्जदाराने कथन केले आहे. त्यामुळे गैरअर्जदारांविरुध्द संरक्षण आदेश न केल्यास अर्जदारांवर पुढेही कौटूंबिक हिंसाचार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्जदाराला संरक्षण देवुन गैरअर्जदारांना पुढील हिंसा करण्यापासुन परावृत्त करणे क्रमप्राप्त आहे. म्हणुन **मुद्दा क्रं. २ चे उत्तर मी होकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u>** :—

**१५.** मुद्दा क्रं. १ व २ चे उत्तर होकारार्थी दिल्यानंतर अर्जदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व दस्तऐवजाचे अवलोकन केल्यानंतर ही बाब सिध्द होते की, अर्जदार ही खाजगी नोकरी करते व त्यातून तीचा उदरनिर्वाह करण्याचा प्रयत्न करीत आहे. अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे तिला अन्न, वस्त्र, निवारा याकरीता रक्कम रुपये २० हजार, प्रवासाकरीता रक्कम रुपये ५ हजार, वैयक्तीक व वैदयकीय खर्चाकरीता रक्कम रुपये १० हजार आणी ॲक्सेस क्रेडीट कार्डचे हप्ते भरण्याकरीता मासिक रक्कम रुपये ६ हजार असा एकूण रक्कम रुपये ४१ हजार ऐवढा खर्च प्रतिमहिना येतो. अर्जदार हिच्या दायित्व व मालमत्ता शपथपत्रात नमूद केल्याप्रमाणे तीला प्रतिमहिना रक्कम रुपये ४९,०३८/— इतके मासिक उत्पन्न आहे. गैरअर्जदार क्र. १ याच्या नि. क्र. २४ वरील दायित्व व मालमत्ता शपथपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यास प्रतिमहिना रक्कम रुपये ८२,०००/— इतके उत्पन्न मिळते असे नमूद करुन एकूण मासिक खर्च रक्कम रुपये ८५,५००/— नमूद करण्यात आलेला आहे. गैरअर्जदार क्र. १ यांनी त्याच्या उत्पन्नातून रक्कम रुपये ४३,०००/— हे कंपनीच्या कामगाराच्या पगारावर खर्च होतो असे नमूद केले आहे. परंतु, त्याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ यास सदरचा खर्च आहे ही बाब संशयास्पद ठरते.

**१६.** गैरअर्जदार क्र १ यांनी अर्जदार यांचा खाण्या पिण्याचा, राहण्याचा व औषधोपचाराचा खर्च केले नसल्याचे कथन अर्जदाराने केले आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार यांचा उदर निर्वाहाचा खर्च केले बाबत पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे अर्जदारांची गैरअर्जदारावरील जबाबदारी टाळता येण्यासारखी नाही. अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्या शारिरीक व मानसीक छळामुळे ती शारिरीक व मानसीक दृष्ठया खचली आहे असे कथन केले आहे. अर्जदार हि नोकरी करत असली तरी गैरअर्जदार क्र. १ यास पती म्हणुन तीच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी टाळता येत नाही. तसेच अर्जदार हिचे उत्पन्न गैरअर्जदाराच्या उत्पन्नाच्या तुलनेत कमी आहे. तसेच अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदाराने तीची आर्थिक फसवणुक केलेली आहे. तसेच अर्जदार हिस घरभाडे भरण्यास भाग पाडलेले आहे. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, गैरअर्जदाराने बळजबरीने तीच्या पगाराच्या खात्यातून मोठया रक्कमा काढून घेतल्या आहेत. तसेच अर्जदार हिच्या परवानगी शिवाय तीच्या बॅक खात्यावर गैरअर्जदार क्र. १ ने मोठया प्रमाणावर आर्थिक व्यवहार केलेले आहे. त्यामुळे अर्जदार हिस मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर रक्कमा परत मिळण्याची विनंती केली आहे. गैरअर्जदाराने सदरचे कथन उलटतपास घेवून खंडीत केलेले नाही त्यामुळे सदरचे कथन विनाआव्हानित राहिले.

**१७.** अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांना पती पत्नी म्हणुन समान दर्जाचे राहणीमान मिळणे कायदयाने अपेक्षित आहे. त्यामुळे अर्जदार हि कमवती असली तरी तीच्या उदरनिर्वाहाची, वैदयकीय व इतर खर्च गैरअर्जदार क्र. १ ने पती म्हणुन करणे आवश्यक आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे अर्जदार हिचा उदरनिवार्हाचा खर्च करण्याकरीता पुरेसे साधन असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. आजची वाढती महागाई व अर्जदार हिचे मासिक उत्पन्न पाहता अर्जदार ही पत्नी

म्हणुन स्वतःचा खाण्यापिण्याचा, राहण्याचा, व औषधोपचाराचा खर्च गैरअर्जदार क्र. १ कडून देणे क्रमप्राप्त ठरते.

**१८.** गैरअर्जदारांविरुध्द अर्जदाराकरीता आर्थिक मदतीचे आदेश करतांना गैरअर्जदारेची आर्थिक कुवत पाहणे गरजेचे आहे. अर्जदाराने शपथेवर कथन केले आहे की, गैरअर्जदार क्रं. १ याच्या कडे पुरेसे उत्पन्नाची साधने आहेत. गैरअर्जदार क्र. १ यांनी त्याच्या मालमत्ता व दायित्व शपथपत्रामध्ये त्याची शैक्षणिक पात्रता केमिकल इंजिनिअर असून तो व्यवसाय करतो असे नमूद केले आहे. तसेच एसजेव्ही इनव्हॉनमेंट इंजिनिअरींग प्रा. लि. या व्यवसायाचा ५० टक्के भागीदार असल्याचे नमूद केले आहे. गैरअर्जदाराने त्यास रक्कम रुपये ८३,०००/— इतके मासिक उत्पन्न मिळते असे शपथपत्रात नमूद केले आहे.

**१९.** अर्जदार हिने तिच्या मालमत्ता व दायित्व बाबतच्या शपथपत्रामध्ये तिला खाण्यापिण्याचा, राहण्याचा, व औषधोपचाराचा खर्च प्रतिमाह ४१०००/— असल्याचे नमुद केले आहे. तसेच ती आई वडीलांकडे राहत असले बाबत नमुद केले आहे. तिच्या सदरच्या शपथपत्रामध्ये तिच्या नावे कोणतीही मालमत्त नसल्याचे दिसुन येते. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. १ यास उत्पन्न असलेबाबत कोणतेही कागदपत्र अभिलेखांवर दाखल केलेले नाहीत. परंतु गैरअर्जदार क्र. १ यांच्यावरील अर्जदारांची जबाबदारी पती म्हणुन नाकारता येणार नाही. तसेच अर्जदार हे माहेरी आल्यापासून त्यांनी त्यांच्या उदरनिर्वाहाची कसलीही सोय केले नसल्याचे दिसून येते. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचे कथन नाकारलेले नाहीत. त्यामुळेच अर्जदार हिचा राहणीमानाचा दर्जा पाहता, अर्जदार हिस दरमहा रू ५,०००/— असे अन्नवस्त्रापोटी, वैदयकीय खर्च व प्रवासाकरीता देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल. त्यामुळे मी **मुद्दा क्रं.३ चे उत्तर** त्याप्रमाणे नोंदविलेले आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>** :—

**२०.** गैरअर्जदाराने अर्जदाराचे दागिने काढून घेतले असा थेट पुरावा उपलब्ध नाही. अर्जदार ही जून २०१९ पासून तिच्या माहेरी राहत असल्याचे अभिलेखावर आले आहे. अर्ज दाखल करेपर्यंत अर्जदाराने गैरअर्जदार यांनी तिचे स्त्रीधन काढूण घेतले अशी कोठेही पोलिस ठाण्यात खबर दिलेली नाही किंवा संरक्षण अधिका—याकडे अर्ज केला नाही. अर्जदाराने रोख रक्कमेच्या स्वरुपात तिच्या स्त्रीधनाची मागणी केलेली आहे. परंतु, सदर रक्कम अर्जदार हिने दिले बाबत कोणाताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. म्हणुन अर्जदार स्त्रीधन व इतर सामान परतीचा आदेश गैरअर्जदारांविरूध्द मिळण्यास पात्र नाही. म्हणुन मी **मुद्दा क्र. ४ चे उत्तर मी नकारार्थी देत** आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता</u>** :—

**२१.** अर्जदाराने गैरअर्जदाराने तिच्या कोणत्या उत्पन्नावर व मालमत्तेचे आणि किती नुकसान केले, कौटुंबिक हिंसाचारामुळे औषधोपचार घ्यावे लागले असे नुकसान झाल्याच्या पुरावा दिला नाही. अर्जदाराचे गैरअर्जदाराने आर्थीक नुकसान केल्याचा पुरावा अभिलेखावर नाही. म्हणुन मी **मुद्दा क्रं.५ चे उत्तर नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ६ करीता</u>** :—

**२२.** अर्जदाराने महिलांचा घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम २००५ च्या कलम १९, अन्वये तिला निवासस्थानाबाबत आदेशाची मागणी केलेली आहे. गैरअर्जदाराने अर्जदार हे त्याच्यापासुन विभक्त झाल्यापासून त्यांच्या उदरनिर्वाहाची कसलीही सोय केले नसल्याचे दिसून येते. अर्जदाराच्या नावे कोणतीही मालमत्ता नाही अर्जदाराच्या आई—वडीलांची आर्थीक परिस्थीती हालाखीचे असल्याचे कथन केले आहे. सदरची बाब गैरअर्जदाराने खोडून काढलेली नाही. त्यामुळे अर्जदार ही माहेरी राहत असल्यामुळे तिला भाडयाचे घर घेवून राहण्याचा अधिकार

आहे. अर्जदार हि सद्या तिच्या माहेरी आई वडीलांकडे राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार त्याच्यापासुन विभक्त झाल्यापासुन तिच्या उदर निर्वाहाची कसलीही सोय केली नसल्याची सिध्द झाले आहे. अर्जदारी ही कमावती व्यक्ती असली तरी गैरअर्जदार क्र. १ यास पती म्हणुन तीच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी टाळता येणार नाही. गैरअर्जदारांनी केलेल्या शारिरीक, मानसिक व आर्थिक छळामुळे अर्जदार हिस व्यथित झाल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे पुरेसे उत्पन्नाचे साधने असलेबाबत अभिलेखावर आलेले आहेत. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिच्याकरीता राहण्याची कोणतीही व्यवस्था केली नसल्याचे दिसून येते. वरील सर्व बाबी विचार घेता गैरअर्जदार क्रं. १ यांनी तिला घ रभाडयाकरीता दरमहा रु.५,०००/— देणे न्यायोचित होईल त्यामुळे मी **मुद्दा क्रं.६ चे उत्तर होकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ७ करीता</u>** :—

**२३.** गैरअर्जदाराने अर्जदाराचा छळ करून तिला घराबाहेर हाकलून दिल्यापासून तिला माहेरी राहावे लागत आहे. गैरअर्जदारांच्या कौटुंबीक हिंसाचारामुळे अर्जदाराला न्यायालयाचा दरवाजा ठोठावून संरक्षण, निवास व निर्वाह भत्ता आदेश मागणी करावा लागला आहे. म्हणून अर्जदार ही प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रू १०००/— गैरअर्जदाराकडून मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्र. ७ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

**१.** अर्जदाराचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

**२.** गैरअर्जदार यांना कलम १८ प्रमाणे असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी अर्जदाराला स्वत: किंवा अन्य कोणा व्यक्तीमार्फत कोणत्याही प्रकारचा त्रास देऊ नये, तिच्याशी तिला त्रास देण्याच्या उद्देशाने संपर्क साधण्याचा प्रयत्न करु नये अथवा ती रहात असलेल्या जागेत तिच्या

ईच्छेशिवाय शिरकाव करण्याचा प्रयत्न करु नये, तसेच तिला कोणत्याही प्रकारची धमकी देऊ नये.

**३.** गैरअर्जदार क्र.१ यांना कलम २०(ड) प्रमाणे असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी अर्जदार हिला दरमहा रु. ५,०००/— (रुपये पाच हजार) अर्ज दाखल तारखेपासून उदरनिर्वाह भत्ता म्हणुन दयावेत.

**४.** गैरअर्जदार क्र. १ यांना कलम १९ प्रमाणे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदारास घरभाडेपोटी दरमहा रु.५,०००/— (रुपये पाच हजार) अर्ज दाखल तारखेपासून दयावेत.

**५.** गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रु.१,०००/— (रुपये एक हजार) अर्जदारास दयावा.

**६.** सदर आदेशाची अंमलबजावणी करण्या करीता आदेशाची एक प्रत संबंधीत पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक यांना पाठविण्यात यावी.

**७.** सदर न्यायनिर्णयाची प्रत कलम २४ प्रमाणे उभयपक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी.

(सदरचा न्यायानिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला आहे)

WAGHMARE KUNAL KUMAR
Digitally signed by WAGHMARE KUNAL KUMAR
Date: 2026.08.14 17:46:21 +0530

( क.क. वाघमारे )

ठिकाणः— पिंपरी — न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

दिनांकः— १४/०८/२०२६. — (७ वे सह न्यायालय) पिंपरी.